||संस्कृती रक्षतिः स्त्री शक्तिः||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा

## ता.चोपडा, जि.जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**



# वार्षिक अहवाल

## वर्ष २०२१-२२


**सुंदरगढी, चुंचाळे रोड,ता.चोपडा,**

**जि.जळगांव**

**फोन नं.०२५८६-२२३०१७**

Website - www.bmcswchopda.org e-mail- bmcsw.chopda@gmail.com

॥ संस्कृती रक्षतिः स्त्री शक्ति ॥

भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव


## सन-२०२१-२२ मधील कार्यक्रमांचा थोडक्यात अहवाल

### दिनांक- १०/०८/२०२१ - आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीर



समाजकार्य महाविद्यालय चोपडा व इनरव्हील क्लब चोपडा-डिस्ट्रीक्ट-३०३ यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांची आरोगय तपासणी व मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. स्तनदा माता व गरोदर माता सप्ताह निमित्ताने त्यांना लोहयुक्त आहार देण्यात आला. त्यात एकुण ७० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. महिलांची आरोग्य तपासणी डॉ.स्नेहल भामरे यांचेकडून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनम गुजराथी तसेच सहसचिव मा.अश्विनीताई गुजराथी उपस्थिती होत्या. या कार्यक्रमासाठी समाजकार्य महाविद्यालयातचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, प्रा.आशिष गुजराथी डॉ.अनंत देशमुख, प्रा.नारसिंग वळवी, डॉ.मोहिनी उपासनी यंनी परिश्रम घेतले आहेत.

### दिनांक- १२/०८/२०२१ ऑनलाईन बेबीनार- कोविड-१९ बाबत-प्रतिबंधात्मक उपाय योजना




समाजकार्य महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत कोविड–१९ बाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना या विषयावर एक दिवशीय ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.पंकजकुमार नन्नवरे, संचालक एन.एस.एस. विभाग, प्रमुख अतिथी म्हणून प्रा.संजय शिंगाणे, विभागीय समन्वयक, रा.से.यो. तर व्याख्याते म्हणुन डॉ.मनिषा करंजे (जिल्हा समन्वयक) उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.डॉ.ईश्वर सौंदाणकर होते.




### दिनांक-१३/०८/२०२१- Healthy Lifestyle Habits and Wellness (Online Webinar)

Sanjeevani Life beyond Cencer in association with College of Social Work Chopda and Rotary Club of Chopda and Inner wheel club of chopda Organizing a webinar on Healthy Lifestyle Habits and Wellness.

स्वच्छता पंधरवाडा अभियान अंतर्गत

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील विद्यार्थ्यांनी आपल्या परीसरात राबविलेल्या सामाजिक उपक्रमा





**दिनांक-१५ ऑगस्ट, २०२१**

दि. १५, ऑगस्ट, २०२१ रोजी भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भगिनी मंडळ चोपडा , संचलित समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व रेडक्रॉस सोसायटी ब्लड बँक , चोपडा आयोजित रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. रक्तदान शिबीराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ. पूनमताई गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव मा. सौ.अश्विनीताई गुजराथी , समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर , ललित कला केंद्राचे प्राचार्य राजेंद्र महाजन , प्राचार्य उदय ब्रम्हे , मुख्याध्यापक श्री.सुनील चौधरी , मुख्याध्यापक श्री. अरुण संदानशिव , मुख्याध्यापक श्री.संजय चौधरी, समाजकार्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेत्तर बंधू व संस्थेतील इतर कर्मचारी उपस्थित होते.या शिबीरात १५ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोलाचे समाजकार्य केले. समाजकार्य महाविद्यालय येथील प्रा. श्री.आशिष गुजराथी व डॉ. राहुल निकम यांनी स्वतः रक्तदान करून समाजकार्याचे एक उदाहरण निर्माण केले. तसेच संस्थेतील प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अरुण संदानशिव व शिक्षक श्री.संजय बारी-सौ.खरात मॅडम-सैय्यद सर तसेच संस्थेतील इतर कर्मचारी वर्ग व माजी विद्यार्थी यांनी देखील रक्तदान करून या रक्तदान शिबीरात बहुमोल असे योगदान दिले महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.नारसिंग वळवी , सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. आशिष गुजराथी व रक्तदान शिबीराचे समन्वयक प्रा.डॉ.अनंत देशमुख यांनी या शिबीराचे नियोजन चांगल्या प्रकारे करुन हे शिबीर यशस्वी केले. तसेच रेडक्रॉस सोसायटीचे पदाधिकारी श्री. किरणभाई गुजराथी यांनी सदर शिबीरासाठी उत्तम नियोजन आणि व्यवस्थापन करून बहुमोल योगदान दिले





**दिनांक-२१ ऑगस्ट, २०२१ - तंबाखु मुक्त अभियान अंतर्गत शपथग्रहण कार्यक्रम-**



तंबाखु मुक्त अभियानांतर्गत महाविद्यालयात शपथग्रहण कार्यक्रमाचे राष्ट्रीय सेवा योजन विभागामार्फत आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अधिकारी डॉ.राहून निकम यांनी तंबाखुचे दुष्परिणामाची माहिती दिली. तसेच तंबाखु न खाण्याची शपथ दिली. या कार्यक्रमास प्रेरणा मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक, म.संजय चौधरी, आय.टी.आय. विभागाचे प्रमुख श्री.ब्रम्हेसर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहून शपथ घेतली.

**दिनांक- २६ ऑगस्ट-२०२१- महारोजगार मेळावा**



कोरोनमुळे दोन वर्षापासुन नोकरी गमावलेल्या युवकांसाठी व बेरोजगार असलेलया युवकांसाठी समाजकार्य महाविद्यालय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व चोपडा पिपल्स को-ऑप बँक यांच्या संयुक्त विद्यमाने महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी चार हजार युवक-युवती हजर होते. एकूण ६० कंपन्या व त्यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. या मेळाव्यात जवळपास १५०० ते १६०० युवकांना रोजगार मिळाला.

**दिनांक- ०४ सप्टेंबर, २०२१- सद्‌भावना पंधरवाडा निमित्ताने ऑनलाईन बेबीनारचे आयोजन**




सद्‌भावना पंधरवाडा दिनानिमित्ताने **सामाजिक ऐक्य आणि तरुणांची भुमिका** या विषयावर ऑनलाईन वेबीनारचे आयोजन कारण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. व्याख्याते म्हणून मा.नरसिंग वाघ (पोलिस उपनिरीक्षक, अमळनेर) लाभले होते. वेबीनारचे आयोजनासाठी डॉ.राहुल निकम, कार्यक्रम अधिकारी व डॉ.संबोधी देशपांडे, सहा.महिला कार्यक्रम अधिकारी रासेयो यांनी परिश्रम घेतले.

**दिनांक- ०३ सप्टेंबर, २०२१- प्रथम वर्ष एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा आयोजन**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी एम.एस.डब्ल्यू. प्रथम वर्षासाठी प्रवेशीत होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यात लेखी परीक्षा, मुलाखत व गृप मुलाखतद्वारे विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. विद्यापीठ नियमानुसार पदवी परीक्षेत मिळालेले गुण व प्रवेश परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार मेरीट यादी तयार करण्यात आली व आरक्षणानुसार प्रवेश निश्चित करण्यात आलेत.

## दिनांक- ०३ सप्टेंबर, २०२१- व्यसनमुक्तीपर जनजागृती कार्यक्रम-

भगिनी मंडळ चोपडा संचलित संचलित समाजकार्य महाविद्यालय ,चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि इनरव्हील क्लब ,चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने चाहर्डी ता.चोपडा येथे व्यसनमुक्तीपर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या माध्यमातून मनोरंजनात्मक पद्धतीने समाजातील व्यसनाधीनतेवर प्रहार करून जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रम हा चाहर्डी गावातील ग्रामपंचायत चौकात घेण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.राहुल निकम (कार्यक्रम अधिकारी,रासेयो विभाग) यांनी केले. प्रा.दिनेश साळुंखे (आंतरराष्ट्रीय कठपुटली, कलावंत) यांनी बाहुल्यांच्या खेळातून व्यसनाधीनतेबाबत समाजात जनजागृती करून व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम उपस्थितांना समजावून सांगितले बाहेर प्रचंड पाऊस पडत असतांना देखील सदर कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित होता. सदर कार्यक्रमास इनरव्हिल क्लब, चोपडाच्या अध्यक्षा सौ.पूनम गुजराथी, इनरव्हील क्लब, चोपडाच्या सेक्रेटरी सौ.मीना पोतदार, जि.प.सदस्या सौ.नीलम पाटील, प्रा.डॉ.सविता जाधव, प्रा.डॉ.मोहिनी उपासनी तसेच इतरव्हील क्लब च्या सर्व सदस्य, महिला मंडळ शैक्षिणक संकुलाचे बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे (महिला कार्यक्रम अधिकारी, रासेयो विभाग, चोपडा ) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.आशिष गुजराथी, श्री.अजय भाट, श्री.प्रसन्न गुजराथी, चाहर्डी येथील आमचे समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी भूषण कोळी आणि सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले



## दिनांक- ०९ सप्टेंबर, २०२१- आदर्श गुणवंत शिक्षक/शिक्षीका सन्मानपत्र वितरण सोहळा





५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे औचित्य साधुन समाजकार्य महाविद्यालय व इनरव्हील क्लब चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श गुणवंत शिक्षक/ शिक्षीका यांचा सन्मान करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.सौ. पुनम गुजराथी, अध्यक्षा भगिनी मंडळ, प्रमुख





अतिथी व व्याख्याते म्हणून डॉ.भावना भोसले, गट शिक्षणाधिकारी, पं.स.चोपडा उपस्थित होते. तर कार्यक्रमास प्राचार्य, डॉ.ईश्वर सौंदाणकर, उप प्राचार्य, डॉ.आशिष गुजराथी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात आदर्श गुणवंत शिक्षक/शिक्षीका यांचा मा.भावना भोसले यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला.

**दिनांक- २६/११/२०२१- संविधान दिनानिमित्त ऑनलाईन वेबीनारचे आयोजन**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय ,चोपडा येथे ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणी विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. प्रमुख अतिथी प्रा.आशिष गुजराथी होते. व्याख्याते म्हणून डॉ.विजय तूंटे ( विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय,अमळनेर) हे होते." भारतीय संविधान आणि सामाजिक जबाबदारी " या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.राहुल निकम (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग) यांनी केले. कार्यक्रमाचा उद्देश समजवून सांगत व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे व्याख्याते डॉ. विजय तुंटे यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय संविधानाचे महत्व , भारतीय संविधानाने सर्व भारतीयांना दिलेले हक्क आणि अधिकार या बाबत सविस्तर माहिती दिली. श्रोत्यांना संविधानाप्रति त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नसल्याचे स्पष्ट केले. व्याख्याना नंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक आणि सविस्तर उत्तर देत शंका निरसन केले. या व्याख्यानास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक , महाविद्यालयातील विद्यार्थी , महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. राहुल निकम, डॉ.संबोधी देशपांडे (महिला कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग) , प्रा.नारसिंग वळवी (कार्यक्रम अधिकारी,विद्यार्थी विकास विभाग) यांनी परिश्रम घेतले. सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारिवृंदांचे सहकार्य लाभले . या प्रसंगी प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर , उपप्राचार्य प्रा.आशिष गुजराथी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.नारसिंग वळवी यांनी केले.





संविधान सप्ताहा निमित्त जनजागृती निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा कार्यक्रम घेत असतांना महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक व इतर मान्यवरांसह गावकरी



संविधान सप्ताहा निमित्त जनजागृती निमित्ताने संविधान प्रास्ताविकाचे सामुहीक वाचन करीत असतांना महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक व इतर मान्यवरांसह गावकरी



संविधान सप्ताहा निमित्त जनजागृती निमित्ताने गावात मशाल रॅलीचे आयोजन प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक व इतर मान्यवरांसह गावकरी

## दिनांक- ०२/१०/२०२१- लालबहादुर शास्त्री व महात्मा गांधी जयंती



समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ईश्वर.सौदाणकर, उपप्राचार्य प्राआशिष गुजराथी., डॉ कार्यक्रम अधिकारी रासेयो) राहुल निकम ( विभाग, डॉ विनोद रायपुरे., डॉ मारोती गायकवाड., प्रा शैलेश. - पाटील आणि सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद...

**बोरअजंटी ता--- चोपडा येथे ग्रामवाचन कट्ट्याची स्थापना .04/10/2021**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बोरअजंटी ता चोपडा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी ग्रामवाचन कट्ट्याचे उदघाटन नुकतेचसंपन्न झाले सदर . बोरअजंटी हे गाव समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तीन वर्षासाठी दत्तक घेण्यात आलेले असून त्या ठिकाणी क . महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार ग्रामवाचन कट्टा सुरू . हा ग्राम .उत्तर करण्यात आला आहे.चौ.ब वाचन कट्टा अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी येथे सुरू करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष आश्रमशाळेच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री कार्यक्रमाचे .पावरा हे होते.पी.डी. प्रमुख अतिथी समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील प्राचार्य डॉईश्वर सौंदाणकर., प्रा कार्यक्रम) नारसिंग वळवी. अधिकारी, विद्यार्थी कल्याण विभाग, समाजकार्य महाविद्यालय,चोपडा.हे होते (

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राकार्यक्रम अधिकारी) राहुल निकम.डॉ.,रासेयो विभाग दत्तक गाव .यांनी केले( घेण्याचा आणि ग्रामवाचन कट्ट्याचा उद्देश त्यांनी स्पष्ट केला गावातील सर्व नागरिकांनी ग्रामवाचन कट्ट्याकरिता ईश्वर सौंदाणकर यांनी ग्रामवाचन कट्ट्याचा लाभप्राचार्य डॉ .पुस्तक देऊन सहभाग नोंदवावा असे आवाहन केले गावातील सर्व आबालवृद्धांनी घ्यावा असे सूचित करत ते स्वतः किमान दहा पुस्तक देणार असल्याचे जाहीर केले . .नारसिंग वळवी यांनी ग्रामविकासात ग्रामकट्ट्याची भूमिका महत्वपूर्ण राहील असे नमूद केलेप्रा

डॉमहिला कार्यक्रम अधिकारी) संबोधी देशपांडे.,रासेयो विभा यांनी रासेयोच्या दत्तक गाव योजनेच्या ( माध्यमातूनआगामी तीन वर्षात अनेकानेक समाजोपयोगी विकासात्मक कार्यक्रम राबविले जातील तेव्हा त्यात सर्व ग्रामस्थांनी योगदान देण्याचे आवाहन केले पावरा सरांनी सदर उपक्रमाबाबत .अध्यक्षस्थानावरून बोलतांना श्री . समाधान व्यक्त करून रासेयोच्या प्रत्येक उपक्रमाला आश्रमशाळेच्यावतीने सहकार्य केले जाईल असे सांगितले.

सदर कार्यक्रमास आश्रम शाळेतील जवळजवळ सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते या . आशिष गुजराथी व सहकाऱ्यांनी समाधान व्यक्त करीत शुभेच्छा.उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा कार्य.दिल्याक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉसंबोधी देशपांडे., परेश चित्ते, आश्रम शाळेतील कर्मचारिवृंद यांनी परिश्रम घेतले



**समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे 'कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण' मोहीम संपन्न** 16/1/2022

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय ,चोपडा येथे क उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ .चौ.ब. ,जळगाव यांच्या निर्देशानुसार कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिम संपन्न झाली . सदरचा उपक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहू नये. . असा या लसीकरण मोहिमेचा उद्देश होता. महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शासनाच्या, महाविद्यालय प्रशासनाच्या आणि रासेयो स्वयंसेवकांच्या आवाहनामुळे या पूर्वीच स्वलसीकरण केलेले आ . .आजच्या .काही बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी कोविड प्रतिबंधात्मक लस घेण्यापासून वंचित होते या लसीकरण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी डॉकार्यक्रम अधिकारी) राहुल निकम.,रासेयो विभाग(, डॉ संबोधी. महिला कार्यक्रम अधिकारी) देशपांडे,रासेयो विभाग कार्यक्रम अधिकारी) नारसिंग वळवी.प्रा (, विद्यार्थी विकास विभाग(, प्राकार्यक्रम अ .सहा) आशिष गुजराथी.धिकारी, विद्यार्थी विकास विभाग यांनी परिश्रम ( .घेतले.या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी नगरपालिका रुग्णालय,चोपडा येथील श्रीमती दीपाली सोनवणे जगदिश बाविस्कर, श्री. नदीम शेख यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ईश्वर सौंदाणकर., उपप्राचार्य प्राया प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक .आशिष गुजराथी यांनी समाधान व्यक्त केले., प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद आणि विद्यार्थी हजर होते.



**दिनांक- ०९ डिसेंबर, २०२१ - क्रीडा स्पर्धेत सहभाग-**

समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथील विद्यार्थी **माळी राजेंद्र सतिष, एस.वाय.बी.एस.डब्ल्यू.** याने डी.डी.एस. महाविद्यालय एरंडोल येथील आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला .

**दिनांक- ११ डिसेंबर, २०२१ - स्व.बिपीन रावत -**

सीडीएस बीपीन रावत चिफ ऑफ डिफेन्स, यांचे अपघाती दुःखद निधन झाले. समाजकार्य महाविद्यालयातर्फे श्रध्दांजलीपर कार्यक्रम घेण्यात आला.





**दिनांक- १७ डिसेंबर, २०२१ - आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक-**




कवयित्री बहिणाबाइर चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आयोजित . आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा धनदाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अमळनेर येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत महाविद्यालयाचा विद्यार्थी नामे-पाटील हितेश सखाराम- एफ.वाय.बी.एस.डब्ल्यू. याने ट्रिपल जम्प या स्पर्धेत एरंडोल विभागातून पहिला क्रमांक पटकवला आहे. तसेच स्टुटंट ऑलंपियाड असोसिएशन तर्फे राज्यस्तरीय स्पर्धा, सोलापुर येथे माळी राजेंद्र सतिश याने कुस्ती स्पर्धेत- गोल्ड मेडल व हॉलीबॉल स्पर्धेतसिल्वर मेडल प्राप्त केले आहे.


**दिनांक- १२ जानेवारी,२०२२ - स्वामी विवेकानंद जयंती- राष्ट्रीय युवा दिन राजमाता जिजाऊ जयंती**




भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्ताने स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला देखील वंदन करण्यात आले. या छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर सर होते. कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाचे स्वरूप लहान ठेवण्यात आले होते.

## दिनांक- १९ जानेवारी,२०२२ - सेमीनार/चिंतन सभा

कोटॅप, मुंबई या संस्थेद्वारा सेमीनार चिंतन सभेचे आयोजन करण्यात आले होते. पोस्ट कोविड-१९ काळात शिक्षण क्षेत्रातील येणाऱ्या समस्यांवर विचार विनिमय करण्यासाठी चिंतन सभेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणून श्री.प्रदिप विठ्ठल गुजराथी, अध्यक्ष, कोटॅप उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राचार्य शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.






## दिनांक- २१ जानेवारी,२०२२ - स्पर्धा परीक्षांची तयारी विषयी मार्गदर्शनपर वेबीनार




महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी द युनिक ॲकॅडमी, पुणे व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने पदवी काळात यु.पी.एस.सी./ एम.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी या विषयावर वेबीनारचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून श्री.निलेश कोंढाळकर होते. तर संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर तर समन्वयक म्हणून डॉ.उत्तम सोनकांबळे होते.

## दिनांक- २५ जानेवारी,२०२२ - राष्ट्रीय मतदार जनजागृती दिवस




भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने "भारतीय लोकशाही बळकटीकरणात मतदानाचे महत्व" या विषयावर ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदर वेबिनारचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. सदर वेबिनारच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदांणकर होते. प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी होते. प्रमुख व्याख्याते डॉ.संजय पाटील (रासेयो कार्यक्रम अधिकारी, पंकज महाविद्यालय ,चोपडा) हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.नारसिंग वळवी (कार्यक्रम अधिकारी,विद्यार्थी विकास विभाग) यांनी केले.

त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. डॉ. संजय पाटील यांनी लोकशाहीतील मतदानाचे महत्व अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उदाहरणांचा आढावा घेत स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना मतदानाप्रति जागृत राहण्याचे आणि जनजागृती करण्याचे आवाहन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संबोधी देशपांडे (महिला कार्यक्रम अधिकारी , रासेयो विभाग) यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.राहुल निकम ( कार्यक्रम अधिकारी , रासेयो विभाग) यांनी केले. महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक यांनी परस्परांना व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने शुभेच्छा दिल्या. या वेबिनारला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक- २२/०२/२०२२ ते २८/०२/२०२२ - विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले. अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोराअजंटी, ता.चोपडा या ठिकाणी शिबीर घेण्यात आले. शिबीराचे उद्‌घाटन मा.श्री संदिपभाऊ बडगुजर, माजी सैनिक यांच्या हस्ते केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानि सौ.पुनम गुजराथी, अध्यक्षा भगिनी मंडळ या उपस्थित होत्या. या शिबीराच्या माध्यमातून विविध लोकाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होंते.







**दिनांक- ०७/०३/२०२२ - एक दिवशिय वक्तृत्व कौशल्य कार्यशाळा सहभाग-**



कबचौ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव विद्यार्थी विकास व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे येथे एक दिवशीस वक्तृत्व कौशल्य कार्यशळेचे आयोजन करण्यात आले होते. येथि महाविद्यालयातील एकूण ८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

**दिनांक- ०८/०३/२०२२ - व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा- युवतीसभा**

कबचौ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत युवती सभा आयोजन करण्यात आले. व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत विद्यार्थीनींचा व्यक्तिमत्व विकास घडून येण्यासाठी विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

त्यात १) युवतींचे आरोग्य- या विषयावर डॉ.कांचन परेश टिल्लू

२) मुलींच्या शिक्षणाचे महत्व- डॉ.निलीमाताई पाटील ३) लिंग समभाव- डॉ.अनंत देशमुख

४) रोजगाराच्या संधी- सौ.निशा पाटील ५) महिला संरक्षण कायदे- ॲड.निर्मला देशमुख

कार्यक्रमाचे उद्घाटन सौ.पुनम गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ यांनी केले. प्रमुख पाहूणे म्हणून सौ.अश्विनीताई गुजराथी, सहसचिव, भगिनी मंडळ चोपडा तर अध्यस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॅ.ईश्वर सौंदाणकर होते.







**दिनांक- ०९/०३/२०२२ ते १६/०३/२०२२ - स्वंयसिध्दा अभियान-**

कबचौ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत स्वयंसिध्दा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थीनींना स्व-संरक्षणार्थ व कराटे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून मा.राजेंद्र जंजाळे, प्रशिक्षक, स्वंयसिध्दा अभियान, जळगांव हे होते.

**दिनांक- १६/०३/२०२२ - कायदे विषयक जनजागृती अभियान-** Legal Aarness Programme

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्फत महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ग्रामिण भागातील महिलांना कायद्यांची माहिती होण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकमाचे उद्घाटन मा.श्री.योगेश पाटील, सहा,आयुक्त, समाजकल्याण, जळगाव यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी- सौ.पुनम गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा तर प्रमुख अतिथी म्हणून सौ.उर्मिलाबेन गुजराथी, सौ.अश्विनीताई गुजराथी, सौ.छायाबेन गुजराथी होत्या. कार्यक्रमाचे व्याख्याते म्हणून-

१) मा.श्री.अवतारसिंग चव्हाण, पोलिस निरीक्षक, चोपडा

२) मा.ॲड.सारंगीताई गुजराथी, सरकारी वकील, धुळे


३) डॉ.गणपत व्ही.धुमाळ, मणियार लॉ कॉलेज, जळगांव

४) सौ.विजयाताई पाटील, माजी सरपंच, आदर्शगाव आडगांव





**दिनांक- २६/०३/२०२२ - पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वेबीनार**




ग्लोकल बोध संस्था,पुणे व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या ब्लॉकप्लेसमेंट संदर्भात सामाजिक क्षेत्रातील मोबाईल ॲप्लिकेशनचे वर्तमान स्थितीमध्ये उपयुक्तता या विषयावर वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते.

**दिनांक- २८/०३/२०२२ -** M.S.W.-II **विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संस्थाभेटी/सहलीचे आयोजन-**

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून शैक्षणिक सहलीचे/संस्थाभेटीचे आयोजन करण्यात आले. त्यात धुळे व शिरपुर येथील विविध संस्थाना भेटी देण्यात आल्यात. १) सप्तश्रृंगी बहुद्देशी संस्था, धुळे २) कौटुंबिक न्यायालय, धुळे  ३) मातोश्री वृध्दाश्रम, धुळे  ४) चाईल्ड लाईन, धुळे ५) विठ्ठल टेक्सटाईल्स, शिरपुर अशा विविध संस्थांना भेटी देण्यात आल्यात.







**दिनांक- ०७/०४/२०२२ -ग्रामिण शिबीर, आश्रमशाळा, सत्रासेन**

FYBSW & MSW-I च्या विद्यार्थ्यांसाठी ग्रामिण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात पर्यावरण संरक्षण, जनजागृती, ग्रामिण विकास तसेच विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. शिबीराचे उद्‌घाटन मा.ज्ञानेश्वर भादले, सेक्रेटरी, धनाजी नाना चौधरी आदिवासी मंडळ, सत्रासेन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सौ.पुनम गुजराथी उपस्थित होत्या.






**दिनांक- १२/०४/२०२२ -विद्यार्थीनींचे हिमोग्लोबीन तपासणी शिबीराचे आयोजन**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमा निमित्ताने महाविद्यालयातर्फे महिला व विद्यार्थीनीचे हिमोग्लोबीन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

**दिनांक- १४/०४/२०२२ -डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**





**दिनांक- १९/०४/२०२२ ते २३/०४/२०२२ - विद्यापीठ स्तरीय युवारंग स्पर्धा सहभाग**

दि १९ ते २३ एप्रिल २०२२ या कालावधीत पुज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय शहादा जिल्हा नंदुरबार येथे विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्वसाचे आयोजन करण्यात आले होते या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या संघाची नोंदणी करुन सहभाग नोंदवला यात खालील विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारात सहभाग नोंदविला.

१) ईशी रोहिणी काशिनाथ S.Y.B.S.W वाद विवाद
२) वसावे प्रियसी कैलास T.Y.B.S.W रांगोळी
३) महाजन कल्याणी सावंत S.Y.B.S.W वादविवाद व वकृत्व

अशा प्रकारे तीन विद्यार्थिनींनी सदर युवक महोत्सवांमध्ये वाद विवाद वकृत्व आणि रांगोळी स्पर्धेत सहभाग नोंदविला यासाठी संघ व्यवस्थापक म्हणून श्री नारसिंग वळवी सहा.प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.





**दिनांक- २८/०३/२०२२ - TYBSW विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संस्थाभेटी/सहलीचे आयोजन-**




विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून शैक्षणिक सहलीचे/संस्थाभेटीचे आयोजन करण्यात आले. त्यात नाशिक परिसरातील विविध संस्थाना भेटी देण्यात आल्यात. १) सहयाद्री फार्म नाशिक, २) समाजकार्य महाविद्यालय, नाशिक, ३) त्र्यंबकेश्वर, ४) दिव्यांग मुलांची संस्था, नाशिक शैक्षणिक सहल प्रमुख म्हणुन प्रा.नारसिंग वळवी यांनी काम पाहिले.

**दिनांक- ०६/०५/२०२२ - राजर्षी शाहु महाराज यांच्या १०० व्या स्मृतीदिन-**




राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती दिनानिमित्ताने भावपूर्ण श्रंध्दांजली कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात डॉ.राहुल निकम, रासेयो, कार्यक्रम अधिकारी यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यातील काही महत्वपूर्ण बाबींवर प्रकाशझोत टाकला. त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता प्रगट केली. सर्व उपस्थितांनी त्यांच्या १०० व्या स्मृतीदिनानिमित्त १०० सेकंद स्तब्ध्द उभे राहून आदरांजली वाहीली.

**दिनांक- २१/०६/२०२२ - योगा डे**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय ,चोपडा येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात संपन्न झाला शासनाचे परिपत्रक ., स्वआरोग्याचे भान आणि सामाजिक आरोग्याच्या संदर्भात जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमा अंतर्गत प्रा राहुल निकम कार्यक्रम अधिकारीडॉ.,रासेयो विभाग यांनी योगाचे मानवी जीवनातील महत्व सांग्ून योग ही जीवन जगण्याची पध्दती असल्याचे स्पष्ट केलेस्वतः . विविध योगासन करून दाखविली आणि उपस्थितांकडून करवून देखील घेतली . या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . कार्यक्रमाच्या यशस्ेवीतेसाठी प्रा महिला कार्यक्रम अधिकारी) संबोधी देशपांडे .डॉ., रासेयो विभाग यांनी परिश्रम घेतलेनारसिंग वळवी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले .प्रा . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ईश्वर सौंदाणकर यांनी आणि सर्व उपस्थितांनी परस्परांना उत्तम निरोगी जीवनासाठी शुभेच्छा देत नियमित योग करण्याचा संकल्प केला.





**दिनांक- २६/०६/२०२२ - छत्रपती शाहू महाराज जयंती, सामाजिक न्याय दिन-**




राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आणि सामाजिक न्याय दिनानिमित्त समाजकार्य महाविद्यालय , चोपडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यास उजाळा देण्यात येऊन त्यांच्या कार्यप्रती कृतज्ञता प्रकट करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.राहुल निकम, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संबोधी देशपांडे यांच्या समवेत प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद विद्यार्थी उपस्थित होते.




**दिनांक-१९/०२/२०२२ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने अभिवादन करतांना महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग**



**दिनांक-३१/०५/२०२२ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती निमित्ताने अभिवादन प्रसंगी मा.श्री.अरुणभाई गुजराथी व कार्यक्रमास उपस्थित महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग**




महाविद्यालयाच्या भेटी प्रसंगी मा.योगेश पाटील, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, जळगांव व सोबत उपस्थित प्राचार्य व कर्मचारी वर्ग




सोलापुर येथील कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त महाविद्यालयीन विद्यार्थी माळी राजेंद्र सतिष याचा सत्कार करतांना मा.श्री.अरुणभाई गुजराथी व महाद्यिालयीन कर्मचारी वर्ग




सोलापुर येथील कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त महाविद्यालयीन विद्यार्थी माळी राजेंद्र सतिष याचा सत्कार करतांना डॉ.आशिष गुजराथी व महाद्यिालयीन कर्मचारी वर्ग




महाविद्यालयास सदिच्छा भेटीप्रसंगी सत्कार स्विकारतांना मा.प्रा.नितीन बारी, व्यवस्थापन परिषद सदस्यकबचौ, उमवि,जळगांव तसेच डॉ.प्रज्ञा जंगले, कोषाध्यक्षा, एन.मुक्ता संघटना कबचौउमवि, जळगांव



महाविद्यालयास सदिच्छा भेटीप्रसंगी मा.प्रा.नितीन बारी, व्यवस्थापन परिषद सदस्यकबचौ, उमवि,जळगांव तसेच डॉ.प्रज्ञा जंगले, कोषाध्यक्षा, एन.मुक्ता संघटना कबचौउमवि, जळगांव



राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्फत महिलांसाठी कायदेविषयक माहिती Legal Aarness Programme कार्यशाळा समन्वयक म्हणून डॉ.मारोती गायकवाड यांचा सत्कार करीत असतांना मा.योगेश पाटील, सहा.आयुक्त, समाज कल्याण जळगांव व इतर मान्यवर

जळगाव
**तरुण भारत**

Main Edition | 2022-03-02 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

# रासेयो विभागाच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १ मार्च**

येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी, ता.चोपडा येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन २२ ते २८ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिराचा समारोप करण्यात आला. अध्यक्षस्थानी अश्विनी गुजराथी (सहसचिव, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा.)होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून छाया गुजराथी (उपाध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा), प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, प्रा.डॉ. आशिष गुजराथी (उपप्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय ,चोपडा.),



धनंजय भादले (उपाध्यक्ष, अनुदानित प्राथमिक,माध्य.व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी), प्रवीण धनगर (प्रगतिशील शेतकरी ), डी. पी.पावरा (मुख्याध्यापक, अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा, बोरअजंटी), किरण पाटील (मुख्याध्यापक, अनुदानित माध्य.आश्रमशाळा, बोरअजंटी) उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीस स्वर्गीय डॉ.सुशीलाबेन शाह (जिजी) यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून त्यांच्या पवित्र आठवणींना उजाळा देण्यात आला. प्रा.डॉ.राहुल निकम (कार्यक्रम अधिकारी, रासेयो विभाग) यांनी शिबिरादरम्यान रासेयो स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याचा आढावा उपस्थितांसमोर सादर केला. प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी रासेयो स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याचे कौतुक करीत आगामी काळात रासेयो विभागाच्या माध्यमातून अधिकाधिक लोकाभिमुख उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी यांनी स्वयंसेवकांनी राबविलेल्या प्रबोधनात्मक उपक्रमाबद्दल समाधान केले.. अध्यक्षस्थानावरून बोलतांना अश्विनी गुजराथ यांनी विद्यार्थ्यांनी राबविलेल्या विविध लोकाभिमुख उपक्रमांचे कौतुक केले.

आयुष्यातील श्रमसंस्कार आणि जीवनमूल्ये जीवनप्रवाहाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातील असा आशावाद व्यक्त केला. यावेळी सहभागी शिबिरार्थी रोशन राठोड, कोमल गोसावी, नैना पावरा, अर्चना पाटील, चेतन शिंदे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. जितेंद्र पाटील व कल्याणी महाजन यांनी 'ग्राम सद्यस्थिती आढावा' सादर केला. सूत्रसंचालन रोहिणी इसे व दीपाली चव्हाण यांनी केले. आभार प्रा.डॉ. संबोधी देशपांडे (महिला कार्यक्रम अधिकारी, रासेयो विभाग) यांनी मानले.

# समाजकार्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघाचा विद्यार्थीशी संवाद

विश्वजगत
हेमकांत गायकवाड
वृत्त - विशेष




चोपडा : समाजकार्य महाविद्यालय चोपडा चे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर तसेच उपप्राचार्य प्रा.आशिष गुजराथी यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा डॉ अनंत देशमुख, प्रा.डॉ गायकवाड यांच्या उपस्थितीत चोपडा येथे भगिनी मंडळ चोपडा कॉलेज ऑफ सोशल वर्क अल्युमनी असोसिएशन च्या वतीने MSW भाग 2 च्या विद्यार्थी यांच्याशी समाजकार्य शिक्षणा नंतर उपलब्ध असणाऱ्या विविध क्षेत्रातील नोकरी विषयक मार्गदर्शन तसेच शासकीय, निमशासकीय तसेच NGO मध्ये काम करत असताना येणाऱ्या अडचणी, संधी तसेच क्षेत्र कार्य करतांना येणाऱ्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांना समाजकार्य शिक्षण घेतांना प्रत्यक्ष तासिका व क्षेत्रकार्याच्या माध्यमातून आत्मसात करावयाची कौशल्ये व ज्ञान यांची व्यावसायिक जिवनातील उपयुक्तता यावर विद्यार्थ्यां सोबत सुसंवाद साधण्यात आला.

त्याप्रसंगी भगिनी मंडळ चोपडा कॉलेज ऑफ सोशल वर्क अल्युमनी असोसिएशन चे अध्यक्ष जितेंद्र महाजन,सचिव कमलेश पवार, खजिनदार भूषण कोळी,सदस्य रमेश कोळी,सदस्या धनश्री राजपूत आदी उपस्थित होते.यात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार हितेंद्र माळी यांनी मानले.

---

जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2021-08-28 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

सभापती प्रमोद शेवाळे, चर्मकार ... पवार, कामल आहर, जयश आहर, ... विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. ... आहेर यांनी मानले. ... वर्षाकाठी तीन सत्रात शंभर मुली व

# चोपड्यात नोकरीच्या शोधात ४ हजार बेरोजगार युवकांची हजेरी

## कोरोनाच्या थैमानामुळे नोकरी मिळेना बेरोजगारीचे विदारक चित्र आले समोर - अरुणभाई गुजराथी

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, २७ ऑगस्ट**

गेल्या दोन वर्षापासून कोरोनामुळे ज्या नोकऱ्या होत्या, त्या ही हिरावल्या गेल्या आणि लाखो तरुण बेरोजगार झाले. त्याच धर्तीवर चोपडा येथे नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आणि त्यात तब्बल चार हजार युवक नोकरीच्या शोधात उपस्थित राहिले. यावरून सध्या रोजगारीचे किती विदारक चित्र निर्माण झाले आहे याचा अंदाज बांधता येईल. अशाही परिस्थितीत राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांनी उपस्थित सर्व बेरोजगार युवकांना नोकरी दिली जाईल. ज्यांनी-ज्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. अशा सर्व युवकांना टप्प्याटप्प्याने नोकरी दिली जाईल असा आशावाद दाखविला.




येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस, चोपडा पीपल्स बँकेच्या सार्वजनिक सेवा ट्रस्ट, भगिनी मंडळ चोपडा, समाजकार्य महाविद्यालय आणि इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने येथील समाजकार्य महाविद्यालयांमध्ये २६ रोजी नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नोकरी देण्यासाठी जवळपास ६० कंपन्या आणि त्यांचे प्रतिनिधींच्या उपस्थितीत नोंदणी केलेले चार हजार बेरोजगार युवकांची इंटरव्यू घेऊन सिलेक्शन करणार होते. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांनीही या मेळाव्यात जे बेरोजगार युवक हजर आहेत या सर्वांना नोकरी दिली जाईल. आजच्या दिनी जवळपास हजार ते दीड हजार युवकांना नोकरी मिळेल असा आशावादही त्यांनी दिला. येथील चोपडा पीपल्स बँकेचे सार्वजनिक सेवा ट्रस्ट मार्फत बेरोजगारी दूर व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यातच हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे पीपल बँकेचे चेअरमन चंद्रहास गुजराथी मनोगतात म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर आशीष गुजराथी, ,संजय गरूड, सुमित पवार, गोरखताल्या पाटील, जीवन चौधरी, मनीषा चौधरी, ॲड. घनश्याम पाटील, सनी सचदेव, शहराध्यक्ष श्यामसिंग परदेशी, शेखर पाटील, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष भारती बोरसे, तालुका अध्यक्ष राजेंद्र पाटील, डॉ. नरेंद्र शिरसाठ, अक्रम तेली, आनंदराव रायसिंग, गिरीश पाटील, पंचायत समिती उपसभापती सूर्यकांत खैरनार , यशवंत पाटील, युवक तालुका अध्यक्ष मनोज पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती दिनकर देशमुख, इनरव्हील अध्यक्षा पुनम गुजराथी, विजय पाटील, नगरसेवक रमेश शिंदे, कृष्णा पवार, नारायण पाटील, प्रवीण गुजराथी, सरचिटणीस अशोक पाटील आदी उपस्थित होते.

नोकरी महोत्सवाचे सूत्रसंचालन संजय बारी, प्रास्ताविक आशिषभाई गुजराथी यांनी केले. या महोत्सवासाठी शहराध्यक्ष श्यामसिंग परदेशी, सनी सचदेव, प्रफुल्ल स्वामी, प्रफुल्ल पाटील, मनोज पाटील, नौमान काझी, अकलाख जहागीरदार आदींनी परिश्रम घेतले.

## STUDENT'S ENROLMENT

NAME OF COLLEGE- **BMC'S,COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA, DIST-JALGAON** COLLEGE CODE-140052

FACULTY AND COURSE - **MM&SS- B.S.W. & M.S.W.** *YEAR-2021-22*

| YEAR | INTAKE CAPACITY | SC | | ST | | VJ/DT | | NT-B | | NT-C | | NT-D | | SBC | | OBC | | OPEN | | TOTAL | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| U.G. | | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| FIRST YEAR | 40+4 | 4 | 3 | 4 | 9 | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 7 | 6 | 2 | 1 | 20 | 22 | **42** |
| SECOND YEAR | 40+3 | 2 | 2 | 7 | 14 | 1 | 0 | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 | 3 | 0 | 1 | 21 | 22 | **43** |
| THIRD YEAR | 40 | 3 | 1 | 4 | 9 | 0 | 0 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 8 | 4 | 1 | 3 | 19 | 20 | **39** |
| **TOTAL** | **127** | **9** | **6** | **15** | **32** | **1** | **0** | **6** | **2** | **1** | **2** | **0** | **0** | **0** | **4** | **25** | **13** | **3** | **5** | **60** | **64** | **124** |
| **P.G.** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| FIRST YEAR | 60+12 | 6 | 6 | 6 | 13 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 3 | 1 | 9 | 18 | 1 | 4 | 28 | 44 | **72** |
| SECOND YEAR | 60+16 | 7 | 6 | 7 | 6 | 1 | 0 | 2 | 0 | 3 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 25 | 9 | 9 | 0 | 55 | 21 | **76** |
| **TOTAL** | **147** | **13** | **12** | **13** | **19** | **1** | **0** | **3** | **0** | **5** | **2** | **0** | **0** | **4** | **1** | **34** | **27** | **10** | **4** | **83** | **65** | **148** |
| **GRANT TOTAL** | **274** | **22** | **18** | **28** | **51** | **2** | **0** | **9** | **2** | **6** | **4** | **0** | **0** | **4** | **5** | **59** | **40** | **13** | **9** | **143** | **129** | **272** |

| **CERTIFICATE COURSE** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Counselling** | 60 | 3 | 1 | 2 | 3 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 9 | 2 | 0 | 0 | 16 | 7 | **23** |
| **NGO's Manegment** | 60 | 3 | 3 | 2 | 3 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 12 | 2 | 4 | 0 | 25 | 8 | **33** |
| **PG Diploma in Management** | 60 | 2 | 3 | 0 | 9 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 8 | 8 | 1 | 2 | 12 | 23 | **35** |
| **Communication Skill in English** | 40 | 2 | 2 | 1 | 3 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 4 | 0 | 0 | 4 | 11 | **15** |
| **TOTAL** | **220** | **10** | **9** | **5** | **18** | **5** | **3** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** | **1** | **30** | **16** | **5** | **2** | **57** | **49** | **106** |

## महाविद्यालयात प्रवेशीत,परीक्षेस बसलेले व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व टक्केवारी दर्शविणारा तक्त

| वर्ष | प्रवेशीत वर्ग | प्रवेशीत विद्यार्थी | | | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | | | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | Total | M | F | Total | M | F | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 2021-22 | F.Y.B.S.W. | 20 | 22 | **42** | 20 | 17 | **37** | 19 | 16 | **35** | **94.59** |
| | S.Y.B.S.W. | 21 | 22 | **43** | 20 | 20 | **40** | 19 | 19 | **38** | **95.00** |
| | T.Y.B.S.W. | 19 | 20 | **39** | 19 | 19 | **38** | 19 | 17 | **36** | **94.74** |
| | **Total** | **60** | **64** | **124** | **59** | **56** | **115** | **57** | **52** | **109** | **94.78** |
| | M.S.W.-I | 28 | 44 | **72** | 22 | 40 | **62** | 22 | 39 | **61** | **98.39** |
| | M.S.W.-II | 55 | 21 | **76** | 53 | 19 | **72** | 48 | 19 | **67** | **93.06** |
| | **Total** | **83** | **65** | **148** | **75** | **59** | **134** | **70** | **58** | **128** | **95.52** |
| | Grand Total | 143 | 129 | 272 | 134 | 115 | 249 | 127 | 110 | 237 | 95.18 |

## Students Statastic Information of GOI & Freeship -2020-21

| *Class* | *S.C. G.O.I.* | | *SC Freeship* | | *SBC G.O.I.* | | *SBC Freeship* | | *OBC G.O.I.* | | *OBC Freeship* | | *NT G.O.I.* | | *NT Freeship* | | *ST G.O.I.* | | *ST Freeship* | | *Other GOI/Free* | | *Total M.F.* | | *Total* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| **FYBSW** | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 4 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 10 | 9 | 19 |
| **SYBSW** | 0 | 2 | 1 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 5 | 3 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 12 | 14 | 26 |
| **TYBSW** | 3 | 3 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 11 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 17 | 7 | 24 |
| **MSW -I** | 6 | 2 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 5 | 9 | 0 | 1 | 7 | 4 | 0 | 0 | 4 | 15 | 1 | 0 | 0 | 0 | 23 | 33 | 56 |
| **MSW -II** | 6 | 3 | 0 | 0 | 3 | 1 | 0 | 0 | 10 | 14 | 0 | 0 | 2 | 2 | 0 | 1 | 5 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 26 | 27 | 53 |
| **Total** | **18** | **10** | **2** | **0** | **5** | **6** | **0** | **0** | **34** | **32** | **0** | **2** | **14** | **8** | **1** | **1** | **13** | **31** | **1** | **0** | **0** | **0** | **88** | **90** | **178** |
| | 28 | | 2 | | 11 | | 0 | | 66 | | 2 | | 22 | | 2 | | 44 | | 1 | | *GOI* | | **84** | **87** | **171** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | *Freeship* | | **4** | **3** | **7** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | **178** | | |